# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

---

दि. 20/07/2022

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शहरातील नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना केल्या जात आहेत. कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासोबतच इतर आजारांवरील वैद्यकीय सुविधा देण्यासाठी महापालिकेमार्फत वेळोवेळी प्रयत्न केले जात असून नागरिकांना योग्य त्या सुविधा देण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून दिनांक <u>10 **जानेवारी,** 2022</u> रोजी पासून महानगरपालिकेच्या **<u>कौलसिटी रुग्णालय, बाभोळा नाका, वसई (प)</u>** येथे कान-नाक-घसा व नेत्ररोग बाह्यरुग्ण सेवेसोबतच **डायलिसिस** ची सेवा देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील किडनीविकारग्रस्त आवश्यक रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी 12 डायलिसिस मशीनचे सुसज्ज असे डायलिसिस युनिट सुरु केले. त्यामध्ये सद्यस्थितीत प्रतिदिन 15 – 20 रुग्ण डायलिसिस सेवेचा लाभ घेत असून दि.19 जुलै 2022 पर्यंत एकुण 1794 डायलिसिस झाले आहेत.

सदरची सेवा ही पूर्णत: विनामूल्य उपलब्ध करून दिली आहे.

तरी सर्व नागरिकांनी महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सदर वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**